## सांख्यिकी माहितीचा वापर

**शिक्षकांसाठी मुद्दे :**

आपल्या दैनंदिन आयुष्यात अनेक प्रकारची माहिती आपल्यासमोर येत असते. त्या माहितीचे विशिष्ट प्रकारे संकलन केले तर त्याचा उपयोग जास्त चांगला होतो.

उदा. आपण वर्गातल्या ४० मुलांचे गणित विषयाचे गुण क्रमाने आपल्यासमोर आहेत. ही एक सांख्यिकी माहिती (data) आहे. या माहितीतून आपल्याला प्रत्येक मुलाने मिळवलेले गुण कळतील. परंतु जर आपण त्यावरून अशी माहिती तयार केली की ८५ च्या वर गुण किती मुलांना आहेत, ५० ते ८५ च्या मध्ये किती मुले आहेत, ५० पेक्षा कमी गुण किती मुलांना आहेत, तर ती माहिती शिक्षक म्हणून आपल्याला अधिक उपयुक्त आहे. अशा प्रकारे कोणत्याही सांख्यिकी माहितीमधून आपल्या दृष्टीने अधिक उपयोगाची माहिती तयार करणे याला सांख्यिकी माहितीचा वापर असे म्हणतात. आपण हे वर्गात मुलांबरोबर अनेकदा करत असतो. (उदा. आज गणवेश घातलेली मुले किती, न घातलेली किती? रिबिनी लावलेल्या मुली किती?) तेच जास्त जाणीवपूर्वक करणे अपेक्षित आहे.

४ रंग ठरवा आणि त्यांच्या सोंगट्या मुलांसमोर ठेवा.

प्रत्येक मुलाने पुढे येऊन मॅथेमॅटवर आपल्या आवडत्या रंगाची सोंगटी लावायची. एकेका रंगाचा स्तंभ तयार करायचा. आवडता रंग या माहितीचा स्तंभालेख मुलांसमोर तयार होईल.

त्यावर आधारित प्रश्न मुलांना विचारा. मुलांनीही प्रश्न तयार करायचे.

याचप्रमाणे आवडत्या खेळांचे रंग ठरवूनही हीच कृती करता येईल.